


# क्विक हिल तर्फे दुर्गम भागातील रुग्णांसाठी रुग्णवाहिका

**पुणे (दै. संध्या) :**

भारताच्या ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुधारण्याकरिता आपली वचनबद्धता आणि सेवेला अधिक बळकटी देण्याकरिता, क्विक हील फाउंडेशन, क्विक हील टेक्नोलॉजीज लिमिटेडच्या सीएसआर शाखेने वाशिममधील अधिकाऱ्यांना दोन अत्याधुनिक वाहने 'आरोग्य यान' सुपूर्द केली. हा दानाचा समारंभ क्विक हील फाउंडेशनच्या प्रमुख श्रीमती अनुपमा काटकर, वाशिमचे जिल्हाधिकारी शण्मुगराजन एस, वाशिमचे जिल्हा परिषद सीईओ वासुमना पंत, असिस्टंट कलेक्टर श्री कुलदीप जंगम आणि क्विक हील फाउंडेशनचे सीएसआर मॅनेजर अजय शिर्के यांच्या उपस्थितीत झाला. या उपक्रमासह, क्विक हील फाउंडेशनने मनोरा व रिसोड तालुक्यातील १ लाखाहून अधिक लोकांसाठी आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करून त्याचे सकारात्मक परिणाम साधण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. सुधारणेची मोठी गरज असलेल्या वाशिम जिल्ह्यातील दुर्गम भागात रुग्णालयात नेण्यासाठी योग्य रुग्णवाहिका नसल्यामुळे रुग्ण जीप किंवा रीक्षासारख्या खासगी वाहतुकीचा पर्याय निवडतात. 'आरोग्य यान' हा उपक्रम क्विक हीलच्या, भारतातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुधारण्याच्या दिशेने सुरु केलेल्या सीएसआर व्हिजनचा एक भाग आहे. क्विक हीलचे 'आरोग्य यान' वाशिममधील डॉक्टर आणि रुग्णांच्या दुर्गम भागातून रुग्णांची वाहतूक आणि नियमित तपासणी, निदान व उपचार यांसारख्या आरोग्य सेवा पुरवेल.